# करेमलकापूर येथील राजेश वाघमारे यांची पोलिस उपनिरीक्षक पदासाठी निवड

देशोन्नती वृत्तसंकलन...

देगलूर ▪ तालुक्यातील करेमलकापूर येथील राजेश बाबूराव वाघमारे यांची महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून घेण्यात आलेल्या परिक्षेत उत्तीर्ण झाल्याने पोलिस उपनिरीक्षक पदासाठी निवड करण्यात आली.



राजेश वाघमारे यांचे प्राथमिक शिक्षण करेमलकापूर जिल्हा परिषद शाळेत झाले. माध्यमिक शिक्षण जिल्हा परिषद शहापूर येथे झाले. माध्यमिक शिक्षण घेत असताना करे मलकापूर ते शहापूर असा सहा कि. मी. चा प्रवास ते पायी करायचे. बारावीपर्यंतचे शिक्षण देगलूर महाविद्यालयातन झाल. तर पदवीपर्यंतचे शिक्षण त्यांनी राजश्री शाहू महाविद्याललय लातूर येथे पूर्ण केले. यापूर्वी त्यांची २०१५ मध्ये वन विभागात औरंगाबाद येथे लेखपाल म्हणून निवड झाली होती. अभ्यासात सातत्य ठेवत त्यांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परिक्षेतून पोलिस सेवेत जाण्याचा निर्णय घेतला व त्यात ते यशस्वी झाले. (ता.प्र.)

Deshonnati Edition
Mar 24, 2022 Page No. 2